प्रेसनोट दिनांक :- २८/०७/२०२६

## महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी प्रतिबंध अधिनियम १९९९ (मोक्का) या गुन्हयात ०३ वर्षांपासून पाहिजे आरोपीतास जेरबंद केलेबाबत.

---

चुनाभट्टी पोलीस ठाणे गु.र.क्र. ५४४/२०२३, कलम ३०२, ३०७, १२०(ब), २१२, २०१, ३४ भा.दं.वि. सह कलम ३, २५, २७ शस्त्र अधिनियम, सह कलम ३७ (१)(अ), १३५ म.पो.का. सह कलम ३(i) (ii), ३(२), ३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी (प्रतिबंध) अधिनियम १९९९ या गुन्हयात अवैध अग्नीशस्त्र पुरवणारा पाहिजे आरोपी सुमित स्वस्तिक सावंत, वय ३२ वर्षे, रा.ठी. चुनाभट्टी, मुंबई - २२ हा गुन्हा दाखल झाल्यापासून अटक टाळण्यासाठी सिंधुदुर्ग, गोवा, चेन्नई, राजस्थान, दिल्ली या परिसरात अस्तित्व लपवुन वावरत होता.

सदर पाहिजे आरोपीताचा शोध घेण्याकरीता गुन्हे शाखा, कक्ष ६ हे समांतर तपास करत होते. आरोपी हा प्रत्येक वेळी स्वताचे अस्तित्व लपवुन राहत होता. त्याअनुषंगाने वेळोवेळी त्याचे तांत्रिक विश्लेषणाचे आधारे नमुद पाहिजे आरोपी हा सध्या खारघर, नवी मुंबई परिसरात लपुन राहत असल्याचे तांत्रीक विश्लेषणाद्वारे स्पष्ट झाले. त्याप्रमाणे सदर तांत्रिक व मानवी कौशल्याचा वापर करुन त्यास गितांजली ज्वेलर्स जवळील सेक्टर १९, खारघर, नवीमुंबई येथुन ताब्यात घेतले.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी सुमित स्वस्तिक सावंत, वय ३२ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी, रा.ठी. १२८/८४, स्वदेशी मिल चाळ, रिलायंस फ्रेश समोर, चुनाभट्टी, मुंबई - २२ यास पुढील कारवाई करीता चुनाभट्टी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात सोपविण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती सो, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) श्री. कृष्ण कांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. नवनाथ ढवळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डी/पुर्व) श्री. धर्मपाल बनसोडे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ६ चे **प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. भरत घोणे,** पो.नि. सुशांत सावंत, **स.पो.नि. नवनाथ काळे,** स.पो.नि. श्रीकांत काळे, मसपोनि रुपाली चौधरी, **पो.उ.नि. शरद नाणेकर,** पोउपनि संदिप रहाणे, मपोउपनि कल्पना माशेरे, पोउपनि सुहास देसाई, **पो.ह.क्र. ०४११३२/गायकवाड,** पो.ह.क्र. ०६०८७६/खेडकर, **म.पो.शि. ०९१३२१/उर्मिला शेवाळे** यांचे पथकाने पार पाडली आहे.

-//-